स्थायी समितीच्या गुरुवार दिनांक 17–05–2012 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 10. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 11. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 12. | सौ. जैस्वाल हर्षला संजय | सदस्या |
| 13. | सौ. अल्का अजय दलाल | सदस्या |

अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 2. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 3. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 24 :– Over load मालाची वाहतुक मुळे रस्त्यांची होणारी दुर्दशा यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता तसेच वजनावर आधारीत मालावर व्यवस्थीत जकातकर निर्धारण होणेकरीता मुख्य जकात नाक्यांवर वजन काटा (Weigh-in-motion) BOT तत्वावर बसविणेबाबत.

उपरोक्त विषयांतर्गत नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी राज्यांतर्गत Over load वाहतुक करणारे वाहनांवर प्रभावी कार्यवाही साठी तसेच जकात नाक्यांवर काही वस्तुवरील जकात ही वजनावर आधारीत असल्याने जकात चोरीस आळा बसविण्यासाठी वजन काटे (Weigh-in-motion) बसविण्याचे निर्देश दिलेले आहेत. मुंबई महानगरपालिकेत सर्व जकात नाक्यांवर Weigh-in-motion वजन काटे बसविले आहेत. त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मुख्य जकात नाक्यांवर वजन कांटे BOT तत्वावर बसविणेकरीता एक प्रस्ताव मागवून त्याचा अभ्यास करण्यात आला. त्यानुसार सर्व खर्च मिळून BOT धारकास पाच वर्षाकरीता रू. 9,61,49,561/– रूपये खर्च येणार आहे. हा खर्च वसुल करण्याकरीता BOT धारकास 54,75,000 वाहनातील मालाचे वजन करावे लागेल. व प्रति वाहन रू.20/– वसुल केल्यास संबंधीत कंत्राटदारास उपरोक्त प्रमाणे लागणारा खर्च वसुल होणेकरीता रू.20/– प्रति वाहन पैकी रू.17.56 प्राप्त होतील व उर्वरीत रू.2.44 प्रति वाहन महानगरपालिकेच्या खात्यात जमा होतील. अशा प्रकारे महानगरपालिकेच्या खात्यात रू.26,71,800/– जमा होतील व पाच वर्षाच्या या BOT प्रकल्प कालावधीत म.न.पा.च्या खात्यात एकूण रू.1,33,59,000/– अतिरीक्त उत्पन्न प्राप्त होईल.

उपरोक्त प्रस्ताव BOT तत्तवावर निविदे द्वारा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 25 :– नागपूर महानगरपालिका जकात विभागात जकात चोरी थांबविणे तथा कर्मचा–यांच्या सुरक्षेतेकरीता पोलिस कर्मचारी यांची सेवा उपलब्ध करुन घेणे.

जकात नाका क्र. 12 रेल्वे पार्सल विभाग याठिकाणी गुंडप्रवृत्तीच्या टोळया सक्रिय झालेल्या आहेत. यांच्या माध्यमातून व्यापारी जकात चोरी करीत असतात त्यास आळा बसावा म्हणून या जकात नाक्यावर पोलीस कर्मचा–यांची नेमणूक करणे व जकात विभागातील भरारी पथकाला सुरक्षा पुरविण्यास्तव पोलीस कर्मचा–यांची नेमणूक एक वर्षाकरीता 12 पोलीस कर्मचारी यांच्या रुपये 56,44,800/– वार्षिक खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 26 :– नागपूर महानगरपालिकेच्या मुख्य जकात नाक्यांवर जकात कार्यवाही करीता आयातकर्त्याकडून घोषणापत्रात खोटी माहिती सादर करून जकातकर चोरी होण्याचे प्रकार निदर्शनास येत असल्याने सदहू बाबीवर आळा बसविण्यकरीता संबंधीत वाहनातील मालाचा प्रकार व परिमाणाबाबत खरी माहिती प्राप्त होणे ठरावी संबंधीत वाहनातील मालाचे क्षकिरण (Scanning) होवून मालाचा प्रकार व परिमाणाची खात्री प्राप्त झाल्यास पुढील कार्यवाही उचित जकात नियमांतर्गत करणे गरजेचे आहे. सदहू

काम BOT तत्वावर देण्याकरीता Expression of Interest मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 27 :— नागपूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयात, महाराष्ट्र . शासनाचे सेतू कार्यालया करीता प्रत्येकी अंदाजे 100 चौ. फुट जागा नाममात्र दरावर रु.1.0 प्रती चौ. फुट प्रती महिना नुसार प्रायोगीत तत्वावर प्रचलीत व अटी शर्तीवर 3 वर्षाचे अस्थायी भाडेपट्यावर नेहरुनगर झोन क्र. 5, लकडगंज झोन क्र. 8, आसीनगर झोन क्र. 9 या तिन विभागीय कार्यालयात उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 28 :— केन्द्र शासनाच्या जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK) योजना राबविण्याकरिता राज्य शासनाचे निर्देश आहेत व यासाठी महिला व बाल कल्याण करिता ठेवण्यात येणाऱ्या निधी मधून 5 टक्के निधी खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

या योजनेत प्रसूती करिता आलेल्या महिलांची संपूर्ण तपासणी, Transport व प्रसुती मोफत करण्यात येईल व प्रसूतीकरिता दवाखान्यात भरती असलेल्या दिवसांकरिता महिलांना आहार मोफत देण्याचे निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त सुविधा म.न.पा. चे कार्यारत दोन दवाखाने इंदिरा गांधी रुग्णालय व पाचपावली सुतिकागृह येथे प्रसूती करणाऱ्या महिलांना लांभ मिळू शकेल. याकरिता रु. 12 लक्ष खर्च अपेक्षित असून उपरोक्त योजना राबविण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 29 :— नागपूर महानगरपालिकेचा महाल स्थीत पशुचिकीत्सालय निःशुल्क चालविण्याकरीता व शहरातील पाळीव कुत्र्यांचा परवाना काढण्याकरीता पशु कल्याण मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या संस्थाकडून Expresion of Interest (IOI) द्वारे प्रस्ताव मागविण्यात आले असता इंडियन सोसायटी फॉर ॲनिमल हयुमन वेलफेयर, नागपूर (ISAW) या संस्थेचे दर रु. 55/— प्रतिश्वान सर्वात कमी असल्यामुळे पाळीव कुत्र्यांचा परवान्याकरीता मनपा तर्फे संस्थेद्वारे रु. 200/— प्रतिश्वान शुल्क आकारणे (रु. 55/— संस्थेचे सेवा शुल्क) व महाल येथील पशुचिकीत्सालय 5 वर्षाकरीता संस्थेला चालविण्याकरीता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित पशु चिकीत्सालयाची जागा ही नागपूर महानगरपालिका, कर्मचारी सहकारी बॅंकेस देण्यात आली आहे. यावर स्थावर अधिकारी यांनी निवेदन केले आहे. या जागेचा ते नियमित ग्रांऊड रेंटचा भरणा करीत आहे. त्यामुळे उपरोक्त प्रस्तावित दवाखाना ज्योती नगर, खदान येथे कोंडवाडयाच्या मोकळया जागेवर बांधकाम करुन सुरु करावा. जो पर्यंत ही व्यवस्था निर्माण होईपर्यंत हा दवाखाना तात्पुरती व्यवस्था म्हणून प्रस्तावित जागेवर सुरु ठेवावा यांसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 30 :— आरोग्य विभागाअंतर्गत झोननिहाय गजबजलेले व लहान रस्ते असलेल्या परिसरातील गडर लाईन चोकेज निवारण तसेच घाणपाणी सक्शन करण्याचा अनुषंगाने प्रथमचरणी 3000 लीटर क्षमतेची सक्शॅन कम जेटिंग

मशिन 20,91,000 रुपयात खरेदी व खरेदी नंतर 3 महिण्याचे Performance समाधानकारक आढळल्यास दुसरे 4000 लीटर क्षमतेची सक्शन कम जेटिंग मशिन 22,40,000 रुपयात ई–निविदेअंतर्गत प्राप्त निम्नतम नमुद दरावर मे. मनियार अन्ड कंपनी कडून खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन 3000 लीटर क्षमतेची सक्शन कम जेटींग मशीन घेण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली परंतु 4000 लीटर क्षमतेच्या मशीनही 3000 लीटर क्षमतेच्या मशीनची कार्यक्षमता (Performance) समाधानकारक असल्याचा अहवालासह स्थायी समितीला सादर करुन स्थायी समितीच्या मंजूरी करीता पाठविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 31 :– स्थायी समिती ठराव क्र. 212 दि. 05.05.2011 अन्वये सिकलसेल असोसीएशन, नागपूर यांना पाचपावली आयुर्वेदिक डिस्पेंसरी मध्ये सिकलसेल प्रकल्प चालविण्यास्तव व याकरिता Solubility Test साठी रु. 15/– व Hb. Electrophoresis साठी रु. 100/– याप्रमाणे दर कराराला मंजूरी देण्यात आलेली आहे.

सिकलसेल असोसिएशन, नागपूर यांचेसोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्याची प्रत स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पाचपावली आयुर्वेदिक डिस्पेंसरी या ऐवजी उपरोक्त प्रकल्प पाचपावली सुतिकागृह येथे सुरु करण्यात यावा यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 32 :– म.न.पा.हॉट मिक्स प्लॉन्ट करिता मेसर्स HPCL/LOCL/BPCL या राष्ट्रीयकृत कंपनी कडून डांबर करण्याकरिता रु. 1,59,96,417/– चे प्रोर्फोरमा इन्व्हाईस प्राप्त केले असून तो नस्तीत संलग्न आहे. रु. 1,59,96,417/– राशीचे अग्रिम टप्याटप्याणे काढण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 33 :– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट विभागा करिता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याकरिता रु. 99,99,610/– राशीचे प्राकलनासा प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व तद्‌नंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 34 :– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट एम,आय,डि.सी. हिंगणा करिता डांबर बि.पी.सि.ल/ आय.ओ.सि.एल./एच.पि.सि. एल.रिफायनरीज मुंबई कडून डांबर वाहतुक करण्याच्या कामाकरिता रु. 39,80,900.00 राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा व तदनंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 35 :– अतिक्रमण विभागाकरिता एक नग 92 इंजिन क्षमता असलेले ऐस्कॉव्हेटर/ लोडर हे J.C.B. India चे अधिकृत विक्रेता गद्रे इंजिनिअरिंग सर्विसेस यांच्या कडून 26,57,492 रुपयात खरेदी व दि. ओरिएन्टल इंन्शुरन्स कंपनी तर्फे 29,371 रुपयात विमाकृत करण्याचा प्रश्न समितीने

विचारात घेऊन प्रस्तावित दर अधिक वाटत असल्यामुळे प्रस्तावित दर कमी करण्यास निगोशिएशन करण्याचे अधिकार मा. आयुक्तास ही स्थायी समिती प्रदान करते व त्यानंतर उपरोक्त प्रस्ताव स्थायी समिती कडे मंजूरीस्तव पाठवावा यांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 36 :– नागपूर शहरात मासोळी बाजारपेठ उभारण्याच्या अनुषंगाने म.न.पा. महाल, मौजा नागपूर येथे ठोक व घाऊक मासोळी विपणन केंद्र, स्थापत्य स्वरुपाचे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. सुविचार कंस्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा वाटाघाटीनंतर 7 टक्के अधिक दर असलेली रु. 90,96,453/– रक्कमेची निविदा मंजूर करण्याा तसेच या कामास्तव आर्किटेक्ट श्री. निशीकांत एन.भिवगडे, यांची प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 37 :– नागपुर शहरातील रस्त्यावरील खड्डयाची दुरुस्ती जेटपॅचरव्दारे करणे.

नागपुर शहरातील रस्त्यावरील खड्डयाची दुरुस्ती जेटपॅचरव्दारे (Cold Mix व Emulsion चा वापर करुन) करण्याबाबत स्थायी समिती ठराव क्र. 76, दि. 19/09/2011 व्दारे प्रायोगीक तत्वावर 4 महिन्याकरिता प्रदान करण्यात आलेली आहे. प्रस्तावातील मान्यतेनुसार जेटपॅचार मशिनद्वारे रस्ते दुरुस्तीचे काम करावयाचे असल्यामुळे कामाचे दर पृथःकरण करण्यात आलेले असून रुपये 800/– प्रति वर्ग मिटर दराने सरासरी 50 मी.मी. जाडीचे थंड मिश्रीत Emulsion वापरुन काम करण्यात येणार आहे. या करिता मा. मुख्य अभियंता, यांची दिनांक 09.12.2011 च्या आदेशानुसार मंजूरी प्राप्त आहे. प्रस्तावित कामाकरिता सन 2012–13 या आर्थिक वर्षात पद क्र. 342 अंतर्गत मा. आयुक्त द्वारा सादर अर्थसंकल्पात रु. 1.00 कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

सर्व साधारणपणे मागील 2 – 3 वर्षाच्या खड्डे दुरुस्ती चा अनुभव लक्षात घेता पावसाळयात व पावसाळयाच्या कालावधी व्यतिरिक्त नोव्हेंबर व डिसेंबर मध्ये व नंतर सुध्दा विविध कारणामुळे खड्डे व रोड कट्सची दुरुस्ती करावी लागते.

जेटपॅचरव्दारे खड्डे दुरुस्तीचे दर विश्लेषण करतांना एक वर्षा करिता लागणा–या खड्डे दुरुस्तीसाठी साहित्य व मशीन चा वापर विचारात घेण्यात आलेला आहे. करितां पूर्ण वर्षाकरिता जेटपॅचर मशीन व्दारे डांबरी पृष्ठ भागावरही पुढील कालावधीसाठी खड्डे दुरुस्ती व रोड कट्सची दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव विचारात घेण्याचे प्रस्तावित आहे. पहील्या वर्षी काम समाधानकारक असल्यास कराराचा कालावधी पूढील 2 वर्षाकरिता वाढविण्यात येईल. 3 वर्षानंतर मा. स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करून पूढील 2 वर्षाकरिता कराराचा कालावधी वाढविण्यात येईल.

प्रस्तावित कामाला सद्या रु. 1,81,28,800/– ची तांत्रिक मान्यता मिळाली आहे. उपरोक्त काम हे तिन वर्षाच्या कालावधीकरीता प्रस्तावित आहे. या कामास अंदाजे रु. 15.00 कोटी च्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करावी व रु. 1,81,28,800/– ची निविदा प्रसिध्द करावयाची परवानगी दयावी. उर्वरित काम अर्थसंकल्पीय अनुदानाच्या उपलब्धतेनुसार करता येईल.

सदर काम जेटपॅचर मशिन व्दारे प्रायोगीक तत्वावर करण्याचे प्रस्तावित असल्याने विशिष्ट स्वरुपाचे कामासाठी निविदेच्या अटी, शर्ती व करार तसेच कामाचा दर मंजुर करण्याचा व निविदा काढण्याची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेण्याकरितां प्रस्ताव सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 38 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /— हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /— दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर